# जागतिक मिशन दिवस २०२४ साठी पोप फ्रान्सिस ह्यांचा संदेश
## २० ऑक्टोबर २०२४

**''जा आणि सर्वांना मेजवानीला आमंत्रित करा''** (मत्तय २२:९)

प्रिय बंधु-भगिनींनो,

ह्या वर्षीच्या जागतिक मिशन दिनासाठी मी जी थीम निवडली आहे, ती शुभवर्तमानातील लग्न समारंभाच्या मेजवानीच्या दृष्टान्तावरून घेण्यात आली आहे (मत्तय २२:१-१४). बोलावलेल्यांनी आमंत्रण नाकारल्यावर कथेतील मुख्य पात्र, राजा, आपल्या सेवकांना सांगतो : ''म्हणून तुम्ही चव्हाट्यावर जाऊन जितके तुम्हांस आढळतील तितक्यांस लग्नाच्या मेजवानीस बोलवा'' (वचन ९). ह्या दृष्टान्ताचा आणि प्रभू येशूच्या स्वत:च्या जीवनाच्या संदर्भात ह्या महत्त्वाच्या परिच्छेदाचा विचार केल्यास आपण सुवार्ता प्रचाराचे अनेक महत्त्वाचे पैलू ओळखू शकतो. प्रभू ख्रिस्ताचे मिशनरी शिष्य ह्या नात्याने आपल्या सर्वांसाठी हे विशेषत: वेळोवेळी दिसून येते. सिनड प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात, ''एकता, सहभाग, मिशन'' ह्या सिनडच्या ब्रीदवाक्याच्या शब्दांत, चर्च तिच्या प्राथमिक कार्यावर पुन्हा लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करते, जे आजच्या जगात शुभवर्तमानाचा प्रचार आहे.

**१) ''जा आणि आमंत्रण द्या!'' परमेश्वराने सज्ज केलेल्या मेजवानीला इतरांना आमंत्रित करण्यासाठी अथक प्रयत्न करण्याचे मिशन.**

राजाने आपल्या सेवकांना दिलेल्या आज्ञेत आपल्याला मिशनचे हृदय व्यक्त करणारे दोन शब्द सापडतात: ''बाहेर जाणे'' आणि ''आमंत्रण देणे.''

प्रथम, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, आधी पाहुण्यांना राजाचे आमंत्रण देण्यासाठी सेवकांना पाठवले गेले होते (वचने ३-४), म्हणून मिशन म्हणजे सर्व स्त्री-पुरुषांना परमेश्वराला भेटण्यासाठी आणि त्याच्याशी संवाद साधण्यासाठी आमंत्रित करण्यास एक अथक प्रयत्न आहे. न थकता! प्रेम आणि महान दयेने समृद्ध असलेला परमेश्वर सतत सर्व स्त्री-पुरुषांना भेटण्यासाठी आणि त्यांची उदासीनता किंवा नकार ह्याला सामोरा जाऊनही त्यांना आपल्या राज्याचा आनंद घण्यासाठी आमंत्रण देण्यासाठी निघतो. येशू ख्रिस्त, उत्तम मेंढपाळ आणि पित्याने पाठवलेला, इस्राएल लोकांच्या हरवलेल्या मेंढराच्या शोधात निघाला आणि अगदी दूरवर विखूरलेल्या मेंढरांपर्यंत पोहोचण्यासाठी त्याला अजून पुढे जाण्याची इच्छा होती (योहान १०:१६). पुनरुत्थानाच्या आधी आणि पुनरुत्थानानंतरही त्याने आपल्या शिष्यांना सांगितले, ''जा!'' अशा प्रकारे प्रभू येशूने शिष्यांना स्वत:च्या मिशनमध्ये सामील करून घेतले (लूक १०:३; मार्क १६:१५). प्रभू परमेश्वराकडून मिळालेल्या मिशनशी एकनिष्ठ राहून, अडचणी आणि अडथळ्यांसमोर कधीही न थकता किंवा नाराज न होता चर्च आपल्या मिशनसाठी सतत पृथ्वीच्या दिगंतापर्यंत जात राहील.

प्रभू ख्रिस्ताच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन ज्यांनी सर्व गोष्टांचा त्याग करून, आपल्या मातृभूमीपासून दूर जाऊन, सुवार्ता ज्या लोकांपर्यंत पोहचली नव्हती अशा ठिकाणी सुवार्ता पोहचल्याबद्दल मी अशा सर्व मिशनऱ्यांचे ह्या निमित्ताने आभार मानतो. प्रिय मित्रांनो, तुमचे उदार समर्पण म्हणजे प्रभू येशूने आपल्या शिष्यांना सोपवलेल्या सर्व राष्ट्रांसाठी (*Ad gentes*) मिशन तुमच्या बांधिलकीची मूर्त अभिव्यक्ती आहे : ‘‘जा आणि सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा’’ (मत्तय २८:१९). पृथ्वीच्या टोकांपर्यंत शुभवर्तमान प्रचाराच्या कार्यासाठी नवीन आणि असंख्य मिशनरी पाचारणांबद्दल आम्ही प्रार्थना करीत राहतो आणि देवाचे आभार मानतो.

आपण हे विसरू नये की, प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला सर्व परिस्थितीत शुभवर्तमानाची स्वत:ची साक्ष देऊन ह्या सामुदायिक मिशनमध्ये भाग घेण्याचे आवाहन केले जाते, जेणेकरून संपूर्ण चर्च तिच्या प्रभू आणि गुरूसह आजच्या जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचू शकेल. ‘‘चर्चमधील आजची परिस्थिती अशी आहे की, प्रभू येशू दरवाजा ठोठावत राहतो, परंतु आतून, जेणेकरून आपण त्याला बाहेर पडू देऊ! बऱ्याचदा आपले चर्च एक ‘कैद’ चर्च बनते जे प्रभूला बाहेर पडू देत नाही. आपण त्याला ‘स्वत:साठी’ ठेवतो. प्रभू तर मिशनसाठी आला होता आणि आपण मिशनरी व्हावे अशी त्याची इच्छा आहे’’ (डिकॅस्टरी फॉर द लेअटी, फॅमिली अँड लाईफ, द्वारा आयोजित परिषदेतील सहभागींना भाषण - १९ फेब्रुवारी २०२३). बाप्तिस्मा घेतलेले आपण सर्वजण आपल्या जीवनातील स्थितीनुसार ख्रिस्ती धर्माच्या सुरुवातीच्या मिशनप्रमाणे एका नव्या मिशनरी चळवळीचे उद्‌घाटन करण्यासाठी सज्ज होऊ या!

दृष्टान्तातील राजाच्या आज्ञेकडे पाहा, तेथे सेवकांना एवढेच सांगितले जात नाही की, ‘‘जा’’, पण त्यांना हेदेखील सांगितले जाते की, ‘‘आमंत्रण करा!’’ व ‘‘लग्नाला या!’’ (मत्तय २२:४). येथे आपण परमेश्वराने आपल्यावर सोपवलेल्या मिशनचा, कमी महत्त्वाचा नव्हे, आणखी एक पैलू पाहू शकतो. आपण कल्पना करू शकतो की, सेवकांनी राजाचे आमंत्रण त्वरेने पण अत्यंत आदराने व दयाळूपणे दिले. त्याचप्रमाणे, प्रत्येक माणसापर्यंत शुभवर्तमान पोहोचविण्याचे मिशन ज्याच्या नावाने उपदेश दिला जात आहे, त्याचा त्याच ‘‘शैलीचे’’ अनुकरण करणे आवश्यक आहे. ‘‘देवाच्या तारणदायी प्रेमाचा चांगुलपणा, येशू ख्रिस्त जो मरण पावला आणि मृतांमधून उठला, त्याच्यामध्ये प्रकट झाला आहे’’ (इवान्जेली गावदियुम ३६), हे जगाला घोषित करण्याचे कार्य मिशनरी शिष्यांनी आनंदाने, उदारतेने व परोपकाराने केले पाहिजे जे त्यांच्यातील पवित्र आत्म्याची फळे आहेत (गलती ५:२२). हे कार्य दबाव आणून, कुरघोडी करून किंवा धर्मांतर करून नव्हे, तर जवळीकता, करुणा आणि कोमलता ह्यांनी केले पाहिजे, अशा प्रकारे हे कार्य देवाची स्वत:ची कार्य करण्याची पद्धत प्रतिबिंबित करते.

**२) ‘‘लग्नाची मेजवानी.’’ ख्रिस्त आणि चर्च ह्यांच्या मिशनचा एस्कॅटोलॉजिकल आणि युखरिस्टीक आयाम.**

दृष्टांतामध्ये राजा सेवकांना आपल्या मुलाच्या लग्नसमारंभाचे आमंत्रण देण्यास सांगतो. ती मेजवानी म्हणजे एस्कॅटोलॉजिकल मेजवानीचे प्रतिबिंब आहे. देवाच्या राज्यात अंतिम तारणाची ही प्रतिमा आहे, जी आजही मसिहा आणि देवाचा पुत्र, येशू ह्याच्या आगमनाने पूर्ण होते, ज्याने आम्हाला विपुल प्रमाणात जीवन दिले आहे

(योहान १०:१०). हे उत्तम द्राक्षारसासहित चविष्ट अन्नाने सज्ज केलेल्या टेबलद्वारे दर्शविले जाते, जेव्हा परमेश्वर मृत्यू कायमचा नाहीसा करील (यशया २५:६-८).

प्रभू ख्रिस्ताचे कार्य काळाच्या परिपूर्णतेशी निगडित आहे, जे त्याने आपल्या मिशनकार्याच्या प्रारंभी जाहीर केले : ''काळाची पूर्णता झाली आहे आणि देवाचे राज्य जवळ आले आहे'' (मार्क १:१५). प्रभू ख्रिस्ताच्या शिष्यांना त्यांच्या प्रभूचे आणि गुरूचे हे मिशन पुढे चालू ठेवण्यासाठी बोलावले आहे. येथे आपण चर्चच्या मिशनरी प्रसाराच्या एस्कॅटोलॉजिकल चरित्र्याबद्दल द्वितीय व्हॅटिकन परिषदेच्या शिकवणीचा विचार करतो : ''मिशनरी कार्याचा काळ प्रभूच्या पहिल्या येण्यापासून ते दुसऱ्या येण्यादरम्यान आहे..., कारण प्रभू येण्यापूर्वी सर्व राष्ट्रांना सुवार्तेची घोषणा झाली पाहिजे (मार्क १३:१०)'' (*Ad gentes* 9).

आपल्याला माहित आहे की, पहिल्या ख्रिस्ती लोकांमध्ये मिशनरी उत्साहाला एक शक्तिशाली एस्केटोलॉजिकल आयाम होता. शुभवर्तमानाच्या प्रचाराची निकड त्यांना जाणवली. आजही हा दृष्टिकोन राखणे महत्त्वाचे आहे, कारण ''प्रभू जवळ आहे'', हे ज्यांना माहित आहे, त्यांच्या आनंदाने आणि ध्येयाकडे वाटचाल करणाऱ्यांच्या आशेने शुभवर्तमानाचा प्रचार करण्यात साहाय्य हाते की, आपण सर्वजण ख्रिस्ताबरोबर देवाच्या राज्यात त्याच्या लग्नाच्या मेजवानीला उपस्थित राहू. उपभोगवाद, स्वार्थी आराम, संपत्तीचा साठा आणि व्यक्तिवाद अशा विविध ''मेजवानी'' जग आपल्यासमोर ठेवत असताना, शुभवर्तमान प्रत्येकाला ईश्वरी मेजवानीला बोलावते, ज्यात देवाशी आणि इतरांशी संवाद साधताना आनंद, साहाय्य, न्याय आणि बंधुता दर्शविली जाते.

प्रभू ख्रिस्ताची देणगी असलेल्या जीवनाची परिपूर्णता आजही प्रभू भोजनामध्ये, म्हणजे मिस्साबलिदानामध्ये उपस्थित आहे. ही जीवनाची परिपूर्णता चर्च प्रभूच्या आज्ञेने त्याचा स्मरणार्थ साजरी करते. आपल्या सुवार्ता प्रचाराच्या मिशनमध्ये सर्वांसाठी उपलब्ध असलेल्या एस्कॅटोलॉजिकल मेजवानीचे आमंत्रण हे मिस्साबलिदान वेदीच्या आमंत्रणाशी आंतरिकरित्या जोडलेले आहे, जेथे परमेश्वर त्याच्या दिव्य शब्दाने आणि त्याच्या शरीराने व रक्ताने आपले पोषण करतो. पोप सोळावे बेनेडिक्ट ह्यांनी शिकवल्याप्रमाणे : ''प्रत्येक मिस्साबलिदान उत्सव देवाच्या लोकांच्या एस्कॅटोलॉजिकल मेळाव्याची पूर्तता करतो. आमच्यासाठी, मिस्साबलिदान मेजवानी ही संदेष्ट्यांनी भाकीत केलेल्या शेवटच्या मेजवानीची खरी पूर्वकल्पना आहे (यशया २५:६-९) आणि नवीन करारामध्ये नमूद केलेल्या ''कोकऱ्याच्या लग्नाची मेजवानी'' आहे, जी मेजवानी (प्रकटीकरण १९:९) संतांच्या सहवासात आनंदाने साजरी केली जाईल'' (साक्रामेंतुम कारितातीस, ३१).

परिणामी, आपल्या सर्वांना प्रत्येक मिस्साबलिदानाला, त्याच्या सर्व परिमाणांमध्ये आणि विशेषत: त्याच्या एस्कॅटोलॉजिकल आणि मिशनरी परिमाणांचा अधिक तीव्रतेने अनुभव घेण्याचे आवाहन केले जाते. ह्या संदर्भात, मी पुन्हा सांगेन की, ''परमेश्वराच्या अंत:करणापासून सुरू होणाऱ्या आणि सर्व लोकांसाठी असलेल्या मिशनमध्ये ओढल्याशिवाय आपण मिस्साबलिदान वेदीकडे जाऊ शकत नाही'' (साक्रामेंतुम कारितातीस ८४). कोविडनंतरच्या काळात अनेक स्थानिक चर्चेसनी कौतुकास्पदरित्या मिस्साबलिदानाच्या नूतनीकरणासाठी हातभार लावला आहे. चर्चच्या प्रत्येक सदस्यामध्ये मिशनरी आत्म्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी देखील

मिस्साबलिदानाचे नूतनीकरण आवश्यक असेल. आपण प्रत्येक मिस्साबलिदानात किती विश्वासाने आणि मनापासून उत्साहाने हे म्हणायला हवे : ''हे प्रभो, तू पुन्हा येईपर्यंत आम्ही तुझ्या मृत्यूची घोषणा करतो आणि तुझे पुनरुत्थान जाहीर करतो.''

२०२५ ह्या ज्युबिली वर्षाच्या तयारीकरीता प्रार्थनेसाठी समर्पित असलेल्या ह्या वर्षात, मी सर्वांना मिस्साबलिदानात भाग घेण्यासाठी आणि चर्चच्या शुभवर्तमान प्रचाराच्या मिशनसाठी प्रार्थना करण्यासाठी आपण आपली वचनबद्धता दृढ करावी ह्यासाठी प्रोत्साहित करू इच्छितो. तारणाऱ्याच्या आज्ञेचे पालन करताना, चर्च प्रत्येक मिस्साबलिदानात ''तुझे राज्य येवो'' ह्या मागणीसह ''आमच्या स्वर्गातील बापा'' ही प्रार्थना करणे थांबवत नाही. अशा प्रकारे, दैनंदिन प्रार्थना आणि विशेषत: मिस्साबलिदान आपल्याला यात्रेकरू आणि आशेचे मिशनरी बनवून आपण देवामध्ये सार्वकालिक जीवनाकडे आणि देवाने त्याच्या सर्व लेकरांसाठी तयार केलेल्या लग्नाच्या मेजवानीकडे प्रवास करतो.

**३) ''प्रत्येकजण''. ख्रिस्ताच्या शिष्यांचे पूर्णपणे सिनोडल आणि मिशनरी चर्चमधील सार्वत्रिक मिशन.**

तिसरे आणि शेवटचे चिंतन राजाचे आमंत्रण स्वीकारणाऱ्यांशी संबंधित आहे : ''प्रत्येकजण''. मी आवर्जून सांगितल्याप्रमाणे, ''हे मिशनचे हृदय आहे, ते म्हणजे ''सर्वजण'', कोणालाही न वगळता. म्हणून आपले प्रत्येक मिशन ख्रिस्ताच्या अंत:करणातून जन्माला येते, ह्यासाठी की, तो सर्वांना आपल्या स्वत:कडे आकर्षित करेल'' (पोन्टिफिकल मिशनरी सोसायटीच्या जनरल सभेला उद्देशून केलेले प्रबोधन - ३जून २०२३). आज, विभाजन आणि संघर्षांनी विखुरलेल्या जगात, ख्रिस्ताची सुवार्ता ही एक सौम्य परंतु ठाम आवाज आहे जो आवाज व्यक्तींना एकमेकांना भेटण्यास, ते भाऊ-बहीण आहेत, हे ओळखण्यास आणि विविधतेत सामंजस्याने आनंद घेण्यास सांगतो. ''आपल्या तारणाऱ्या परमेश्वराची प्रत्येकाचे तारण व्हावे आणि त्यांनी सत्याच्या परिपूर्ण ज्ञानापर्यंत पोहचावे अशी इच्छा आहे'' (१तिमथ्य २:४). तेव्हा, आपण हे कधीही विसरू नये की, आपल्या मिशनरी कार्यात आपल्याला सर्वांना शुभवर्तमानाचा प्रचार करण्यास सांगितले जाते : ''नवीन जबाबदाऱ्या लादण्याऐवजी, आपण अशाप्रकारे वागले पाहिजे की, जे आपला आनंद इतरांबरोबर वाटू इच्छितात, जे सौंदर्याच्या क्षितिजाकडे बोट दाखवतात आणि जे इतरांना स्वादिष्ट मेजवानीला आमंत्रित करतात'' (इवान्जेली गावदियुम, १४).

ख्रिस्ताच्या मिशनरी शिष्यांना नेहमीच सर्व लोकांबद्दल मग त्यांची सामाजिक किंवा नैतिक स्थिती काहीही असो, मनापासून काळजी होती. मेजवानीचा दृष्टान्त आपल्याला सांगतो की, राजाच्या आज्ञेनुसार, सेवकांनी ''चांगले आणि वाईट असे जे सर्व त्यांना सापडले'' त्यांना त्यांनी एकत्र जमवले (मत्तय २२:१०). इतकेच काय, तर दरिद्री, व्यंग, आंधळे आणि लंगडे (लूक १४:२१), एका शब्दात सांगायचे तर, समाजाने उपेक्षित केलेले आपले सर्वांत कनिष्ठ बंधु-भगिनी हे राजाचे खास पाहुणे असतात. परमेश्वराने सज्ज केलेली त्याच्या पुत्राच्या लग्नाची मेजवानी सर्वांसाठी नेहमीच खुली असते, कारण त्याचे आपल्या प्रत्येकावरील प्रेम विपुल आणि बिनशर्त आहे. ''देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याच्यावर

विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे'' (योहान ३:१६). प्रत्येकाला, म्हणजे प्रत्येक पुरुष आणि प्रत्येक स्त्री ह्यांना देवाने त्याच्या कृपेत सहभागी होण्याचे आमंत्रण दिले आहे, ज्या कृपेमुळे परिवर्तन आणि तारण होते. त्या दैवी देणगीला फक्त ''हो'' म्हणणे, ते स्वीकारणे आणि त्याद्वारे स्वत:चे रूपांतर होऊ देणे. हे ''लग्नाचा पोषाख'' घालण्यासारखे आवश्यक आहे (मत्तय २२:१२).

सर्वांसाठी असलेल्या मिशनसाठी सर्वांच्या बांधिलकीची गरज आहे. सुवार्तेच्या सेवेत पूर्णपणे सिनोडल आणि मिशनरी चर्चच्या दिशेने आपला प्रवास सुरू ठेवणे आवश्यक आहे. सिनोड्यालिटी मूलत: मिशनरी आहे आणि ह्याउलट, मिशन हे नेहमीच सिनोडल आहे. परिणामी, वैश्विक चर्चमध्ये आणि स्थानिक चर्चेसमध्ये घनिष्ठ मिशनरी सहकार्य आज अधिकाधिक तातडीचे आणि आवश्यक आहे. दुसरी व्हॅटिकन परिषद आणि माझ्या पूर्वाधिकाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवत मी जगभरातील सर्व धर्मप्रांतांना पॉन्टिफिकल मिशन सोसायटीच्या सेवेची शिफारस करतो. हे धर्मप्रांत प्राथमिक साधनांचे प्रतिनिधित्व करतात, ''ज्याद्वारे कॅथलिक सुरुवातीपासूनच खऱ्या अर्थाने सार्वत्रिक आणि मिशनरी दृष्टिकोनाने प्रेरित होतात आणि प्रत्येक मिशनसाठी त्यांच्या गरजेनुसार प्रभावीपणे निधी गोळा करण्याचे एक साधनदेखील आहेत'' (*Ad gentes* 38). ह्या कारणास्तव, सर्व स्थानिक चर्चेसमध्ये जागतिक मिशन दिनादिवशी गोळा करण्यात आलेले दान पूर्णपणे एकात्मतेच्या सार्वत्रिक निधीसाठी जाते, जे दान चर्च 'पॉन्टिफिकल सोसायटी ऑफ द प्रोपगेशन ऑफ द फेथ' द्वारा सर्व मिशनच्या गरजांसाठी पोप महोदयांच्या नावाने वितरण करते. आपण अधिक सिनोडल आणि अधिक मिशनरी चर्च होण्यास परमेश्वराने आपणांस मार्गदर्शन व साहाय्य करावे, म्हणून आपण प्रार्थना करू या (बिशपांच्या सिनडच्या सर्वसाधारण महासभेच्या समारोप समारंभासाठी दिलेल्या प्रवचनातून - २९ ऑक्टोबर २०२३).

शेवटी, आपण आपली नजर पवित्र मरियेकडे वळवू या, जिने प्रभू येशूला गालिलातील काना येथे एका लग्नसमारंभात आपला पहिला चमत्कार करण्यास सांगितले (योहान २:१-१२). परमेश्वराने कालांतराने सर्वांसाठी तयार केलेल्या लग्नाच्या मेजवानीची पूर्वकल्पना म्हणून प्रभू येशूने नवदाम्पत्यांना आणि सर्व पाहुण्यांना विपुल प्रमाणात नवीन द्राक्षारस पुरवला. ख्रिस्ताच्या शिष्यांच्या शुभवर्तमानाच्या प्रचारकार्यासाठी आपण आपल्या आजच्या युगात पवित्र मरियेच्या मातृमध्यस्थीसाठी विनंती करू या. आपल्या मातेच्या आनंदाने आणि प्रेमळ काळजीने, कोमलता आणि आपुलकीतून जन्मलेल्या सामर्थ्याने (इव्हेन्जली गावदियुम, २८८), आपल्या तारणहार राजाचे आमंत्रण सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी आपण सज्ज होऊ या. पवित्र मरिया, सुवार्ता प्रचाराची तारा, आमच्यासाठी प्रार्थना कर!

रोम, सेंट जॉन लॅटरन, २५ जानेवारी २०२४, संत पौलच्या परिवर्तनाचा सण.

**+ पोप फ्रान्सिस**